## निशाणी क्र.४१ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं.८ यांचे समन्स त्याचे घराचे दर्शनी भागावर डकवुन बजावणी करीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी नं.८ यांना समन्स बजावणी करीता गेले असता यातील प्रतिवादी नं.८ यांची आई यांनी समन्स घेण्यास नकार दिला असुन प्रतिवादी नं.८ कोठे राहतात व मोबाईल नंबर देण्यास नकार दिलेबाबत रिपोर्ट दाखल केला आहे. सदर प्रतिवादी नं.८ हा कायमस्वरुपी बनपुरी, ता. आटपाडी, जि. सांगली येथेच राहण्यास आहे. त्याबाबत वादीस कॅव्हेट अर्जाची प्रत ही रजिस्टर पोस्टाने पाठवलेली होती. त्यामध्ये प्रतिवादी नं.८ याचा पत्ता हा रा. बनपुरी असाच नमुद केलेला आहे. सदर प्रतिवादी नं.८ हा मुद्दाम व जाणुनबुजून बजावणी करुन घेत नाही. सदर प्रतिवादी नं.१ ते ४ हे या दाव्यात हजर झाले असुन सदर प्रतिवादी नं.१ हे प्रतिवादी नं.८ यांचे वडील आहेत व प्रतिवादी नं.२ ही आई आहे. केवळ सदरचा दावा लांबविण्याकरीता सदर प्रतिवादी नं.८ हा समन्सची बजावणी करुन घेत नाही म्हणुन वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी नं.८ यांचेवर समन्स डकवुन बजावणेचा आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. वादीच्या विधीज्ञांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे युक्तीवाद करुन नि.४० सोबत प्रतिवादी यांनी वादीस पोस्टाने पाठवलेल्या कॅव्हेट नोटीसची प्रत व सदर कॅव्हेट नोटीसचे लखोटा यावर भर दिला.

४.  वादीने सदरचा दावा हा सरसनिरस मानाने वाटप, ताकीद व जाहीर होण्याबाबत दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी नं.८ काशिलिंग काका यमगर यांना सदर दाव्याचे समन्स नि.१३ नुसार पाठविण्यात आले होते. सदर समन्स हे 'प्रतिवादी नं.८ समक्ष भेटले नाहीत, त्यांची आई समक्ष भेटली. त्यांनी प्रतिवादी नं.८ हा त्यांचा मुलगा असुन तो परराज्यात राहतो असे सांगितले. तेव्हा प्रतिवादी नं.८ यांचा फोन नंबर व कोणत्या राज्यात राहतात याचा पत्ता मागितला असता त्यांनी तो कोणत्या राज्यात राहतो हे त्यांना माहित नाही व मोबाईल नंबर देखील नाही असे सांगितले. त्यांना नोटीस घेण्यास सांगितले असता त्यांनी नोटीस प्रत घेण्यास नकार दिला.' या शे–यासह परत आले. त्यानंतर प्रतिवादी नं.८ यांना सदर दाव्याचे समन्स हे नोंदणीकृत डाकेने पाठविले होते, परंतु रा.प.धारक परगावी पत्ता मिळत नाही या शे–यासह सदरचे टपाल परत आले.

५.  प्रतिवादी नं.२ ही प्रतिवादी नं.८ याची आई असुन प्रतिवादी नं.८ हा कोणत्या राज्यात राहतो व त्याचा मोबाईल नंबर त्यांना माहित नाही हि बाब विश्वासार्ह वाटत नाही. सदरकामी वादी यांनी नि.४० वरील फेरीस्तसोबत त्यांना मिळालेली कॅव्हेटची नोटीस व सदर नोटीस ज्या लखोट्यामध्ये पाठविण्यात आली होती तो लखोटा सदर कामामध्ये दाखल केलेला आहे. सदर कॅव्हेट नोटीसचे अवलोकन केले असता अर्जदार / कॅव्हेटर नं.५ म्हणुन प्रतिवादी नं.८ याचे नाव आहे व सदर नोटीसमध्ये अर्जदार नं.५ याचा पत्ता रा. बनपुरी, ता. आटपाडी, जि. सांगली असा नमुद केलेला आहे. यावरुन प्रतिवादी नं.८ याचा पत्ता हा बनपुरी, ता. आटपाडी, जि. सांगली

असा असल्याचे दिसुन येते. बेलिफ रिपोर्ट व नोंदणीकृत डाकेच्या रिपोर्टवरुन प्रतिवादी नं.८ हा मुद्दामहुन सदर दावा समन्सची बजावणी करुन घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसुन येते.

**६.** ज्यावेळी प्रतिवादी हा आढळुन येत नाही किंवा तो दाव्याचे समन्स अथवा नोटीस बजावुन घेण्यास टाळाटाळ करत आहे असे निदर्शनास आल्यास त्याचेविरुध्द तो शेवटी राहत असलेल्या पत्त्यावरील घराच्या दर्शनी भागावर समन्स डकवुन बजावणी करता येते. सदर प्रकरणात प्रतिवादी हा मुद्दामहुन सदर दाव्याचे समन्स बजावुन घेत नसल्याचे दिसुन येते. सबब वादीचा सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.८ यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० नुसार प्रतिवादी नं.८ याच्या बनपुरी, ता. आटपाडी, जि. सांगली येथील घराच्या दर्शनी भागावर समन्सची डकवुन बजावणी करण्याकरीता समन्स काढण्यात यावे.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.07.13 17:44:41 +0530

आटपाडी.                    **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– १३/०७/२०२३.                    सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 13.07.2023
Order signed by the
Presiding Officer on - 13.07.2023
Order uploaded on - 13.07.2023